# कै. बाळासाहेब वाघ : एक द्रष्टा कर्मयोगी

**सुधीर मुतालिक**

**शिक्षण, सहकार, समाजसेवा, कृषी, जलव्यवस्थापन, उद्योग आणि सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या कै. बाळासाहेब वाघ यांचा आज, स्मृतिदिन. शैक्षणिक क्षेत्रात त्यांनी उल्लेखनीय कार्य केले. यानिमित्त त्यांच्या कार्याचा घेतलेला आढावा.**

**निमित्त**

नाशिक जिल्ह्याच्या विकासात ज्यांनी मोलाचे योगदान दिले, त्यात कै. बाळासाहेब वाघ (भाऊ) यांचा उल्लेख अग्रक्रमाने करावा लागेल. कै. काकासाहेब वाघ यांचा समृद्ध वारसा लाभलेल्या या ध्येयवेड्या नेतृत्वाने शिक्षण, सहकार, समाजसेवा, कृषी, जलव्यवस्थापन, उद्योग आणि सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केली. एक उद्योजक म्हणून नाशिकमध्ये स्थिरावत असताना त्यांचे नाव ऐकले होते; मात्र प्रत्यक्ष परिचय त्यांच्या शैक्षणिक कार्यामुळे झाला.



के. के. वाघ शिक्षण संस्थेच्या माध्यमातून केजीपासून पीएच.डी.पर्यंत शिक्षण देणारा मोठा शैक्षणिक समूह उभारून तो आंतरराष्ट्रीय पातळीवर नेण्याचे अतुलनीय कार्य त्यांनी केले. विविध शाळा व महाविद्यालये सुरू करताना, तसेच अभ्यासक्रम निवडताना त्यांनी दाखवलेली दूरदृष्टी त्यांच्या 'द्रष्ट्या कर्मयोगी' व्यक्तिमत्त्वाची साक्ष देते.

अभियांत्रिकी महाविद्यालय व तंत्रनिकेतन चालवताना उद्योगांशी सांगड घालणे आवश्यक आहे, हे त्यांनी फार पूर्वीच ओळखले. प्राध्यापकांनी औद्योगिक क्षेत्रातील मान्यवरांशी संवाद साधावा, यासाठी ते सातत्याने प्रोत्साहन देत. त्यामुळे के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालय व तंत्रनिकेतनचा औद्योगिक आस्थापनांशी जो समन्वय निर्माण झाला, तो इतरत्र क्वचितच दिसतो. महाविद्यालयातील अद्ययावत वर्कशॉप्स व प्रयोगशाळा पाहताना काळानुरूप बदल करण्याची त्यांची हातोटी स्पष्ट जाणवली. तंत्रज्ञानातील झपाट्याने होणारे बदल विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचावेत आणि जागतिक स्पर्धेत ते कमी पडू नयेत, यासाठी ते आग्रही असत. परिणामी, दरवर्षी सुमारे १५० नामांकित कंपन्या कॅम्पस प्लेसमेंटसाठी येतात आणि सुमारे ७५ टक्के विद्यार्थ्यांना पदवी पूर्ण होण्याआधीच रोजगार मिळतो. अनेक विद्यार्थी स्वतःचे उद्योग उभारतात; काही जण कुटुंबीय व्यवसाय अधिक उंचीवर नेतात, हा अनुभव माझ्याही बाबतीत आहे.

कॉन्फडरेशन ऑफ इंडियन इंडस्ट्रिजमध्ये काम करताना उद्योग-शिक्षण समन्वयासाठी मला त्यांचे मार्गदर्शन मिळाले. के. के. वाघ संस्थेच्या सहकार्याने नाशिकमध्ये 'कृषी-उद्योग संगम' परिषद झाली; प्रदर्शन, कार्यशाळा, सेमिनार यांना हजारो शेतकऱ्यांनी भेट दिली. सर्व सत्रांना उपस्थित राहून त्यांनी उत्साहाने स्वागत केले. त्यांच्या प्रेरणेमुळे सीआयआय-एआयसीटीई सर्वेक्षणात दोन्ही संस्थांना सलग चार वर्षे 'प्लॅटिनम' सन्मान मिळाला. उद्योगांच्या गरजा समजून घेण्यासाठी त्यांनी सीईओ मीट, एचआर कनेक्ट असे उपक्रम राबवले. कृषी शिक्षणासाठी विनाअनुदानित कृषी महाविद्यालये स्थापन केली, तसेच विनाअनुदानित संस्थांच्या प्रश्नांसाठी तीन असोसिएशन स्थापन करून नेतृत्व केले.

समाजासाठी काही तरी देण्याच्या भावनेतून 'कर्मयोगी' व 'कृषितपस्वी' पुरस्कारांची संकल्पना त्यांनी मांडली. वयाच्या ९०व्या वर्षीही त्यांनी यशाचे श्रेय सहकाऱ्यांना देत मनाचा मोठेपणा दाखवला. आज ते आपल्यात नसले तरी त्यांचे विचार प्रेरणा देत राहतील; त्यांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन.

**(लेखक हे उद्योजक आहेत.)**